मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विरोधी पक्षनेते दानवे यांच्याकडून जनसामान्यांच्या तक्रारींचा निपटारा

## आकुर्डीत जनाधिकार जनता दरबारात शेकडो नागरिकांची उपस्थिती

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा राज्यव्यापी जनाधिकार जनता दरबार कार्यक्रम सोमवारी पिंपरी चिंचवडमध्ये आकुर्डी, खंडोबा मंदीर सभामंडप येथे पार पडला. या कार्यक्रमात शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून विविध तक्रारी मांडल्या. त्या संदर्भात तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क साधून जनसामान्यांच्या या तक्रारींचा निपटारा केला.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आयोजित या जनाधिकार जनता दरबार कार्यक्रमात शेतकरी, शेतमजूर, नोकरदार, माथाडी कामगार, व्यापारी, व्यावसायिक, विद्यार्थी, निराधार व दिव्यांग नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या निवेदनाव्दारे आणि प्रत्यक्ष अशा प्रकारे दोनशेपेक्षा अधिक तक्रारी अंबादास दानवे यांच्या समक्ष उपस्थित केल्या.



यावेळी पुणे जिल्हा संपर्कप्रमुख, आमदार सचिन आहेर, मावळ संघटक संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, पिंपरी चिंचवड मावळ संपर्क प्रमुख लतिका पाष्टे, पिंपरी चिंचवड शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, ज्येष्ठ नेते एकनाथ पवार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, अनिताताई तुतारे, शहर युवा अधिकारी चेतन पवार, उपजिल्हाप्रमुख वैशाली मराठे तसेच निलेश मुटके, धनंजय आल्हाट, तुषार नवले, अनंत कोऱ्हाळे, रोमी संधू, हाजी मणियार दस्तगीर, डॉ. वैशाली कुलथे, कल्पना शेटे, तुषार नवले, मिनल यादव आदींसह पक्षाचे उपशहरप्रमुख, संघटक, उपसंघटक, सर्व प्रमुख पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शासन आपल्या दारी या कार्यक्रमाचा समाचार घेतला. अंबादास दानवे म्हणाले की, राज्यातील घटनाबाह्य महायुती सरकार शासन आपल्या दारी कार्यक्रमातून लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत असल्याचा गाजावाजा करत आहे. प्रत्यक्षात या माध्यमातून महायुतीचे सरकार मोठ्या प्रमाणावर जाहिरातबाजी करून मार्केटिंग करण्यात व्यस्त आहे. नागरिकांच्या तिजोरीतून मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. शासन आपल्या दारी म्हणतात, पण ते कुठे जातात, हे काही समजत नाही. जनतेच्या प्रश्नांच्या विषयाकडे दुर्लक्ष केले जाते.या जनता दरबारात नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली. त्यांच्या समवेत बैठक घेत विविध विषयावर चर्चा करत महापालिकेच्या विविध विभागांशी संबंधित नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# भुजबळ यांच्यावर गुन्हा दाखल करा : मराठा क्रांती मोर्चा

## अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा सतीश काळे यांनी दिला इशारा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा समाजाच्या हजामती करू नका म्हणत दोन समाजामध्ये सामाजिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते सतीश काळे यांनी केली. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा काळे यांनी दिला आहे. पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांना दिलेल्या निवेदनात काळे यांनी ही मागणी केली आहे. सतीश काळे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मराठा समाज आपल्या आरक्षणासाठी संविधानिक मार्गाने लढा देत आहे. इतर समाजाला न दुखावता आरक्षणाचा हक्क मिळावा, यासाठी शासकीय स्तरावर पाठपुरावा करत आहे. असे असताना काही जण मराठा समाजाच्या विरोधात इतर समाजाच्या मनात द्वेष निर्माण करण्याचे काम करत आहे. महाराष्ट्र राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यामध्ये मोठी कळीची भूमिका बजावत आहे. नुकतेच त्यांनी अहमदनगर येथे ओबीसी भटके विमुक्त एल्गार सभेत मराठा समाजाच्या विषयी चुकीची वक्तव्य करत नाभिक समाज बांधवांना आवाहन केले की, मराठा समाज बांधवांची केस आणि दाढी करू नये, त्यांच्यावर बहिष्कार टाका. बहिष्कार टाकण्याची भाषा करत दोन समाजामध्ये दुही पसरवून सामाजिक तेढ निर्माण केल्याबद्दल मंत्री छगन भुजबळ यांच्यावर कायदेशीर कारवाई करा. तसेच राज्य सरकारने त्यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी. मंत्री छगन भुजबळ हे समता परिषदेच्या माध्यमातून ओबीसी बांधवांसाठी काम करत असल्याचा दिखावा करत आहे. दोन समाजामध्ये भांडणे लावून कोणती समता भुजबळ आणत आहेत, हे आधी त्यांनी स्पष्ट करावे. भुजबळ यांच्या कोणत्याही प्रलोभनांना, भाषणांना आता ओबीसी बांधवांनी बळी पडू नये असेही आवाहन काळे यांनी केले आहे. तसेच समाजासमाजामध्ये द्वेष निर्माण केल्याबद्दल त्वरित मंत्री भुजबळ यांच्यावर गुन्हा दाखल करावा.अन्यथा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशारा काळे यांनी दिला.

# मावळात १५ कोटींच्या कामाची उद्घाटने

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचा झंझावाती दौरा



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मावळ लोकसभा मतदारसंघातील सहाही विधानसभा मतदारसंघात विविध विकास कामे सुरू आहेत. आदिवासी पाडे, वाड्या, वस्त्या असा विस्तारलेल्या मावळ विधानसभा मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे यांच्या स्थानिक विकास निधी, सामाजिक न्याय, जिल्हा नियोजन मधून आलेल्या निधीमधून केलेल्या विविध १५ कोटींच्या विकास कामांचे उद्घाटन व भूमिपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते झाले. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुका प्रमुख राजेश खांडभोर, मुन्ना मोरे यांच्यासह सोमाटणे, शिरगाव, पुसाणे, पिंपळखुटे, दिवड,बेबेड ओव्हळ, ओव्हळे, धामणे, डोने, परंदवाडी, आढले बु, खु, चांदखेड, पाचाने, कुसगाव गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी सुरू झालेला दौरा रात्री उशिरापर्यंत सूरु होता. रात्री उशीर हेऊनही ग्रामस्थ,गावचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार बारणे यांनी मावळमधील विविध गावात अंतर्गत रस्ते, मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला. गावावात रस्ते मजबूत केले आहेत. कोरोना महामारीतही मावळचा विकास रखडला नाही. पुणे जिल्हा नियोजन समितीमधून निधी मिळवत मावळमधील विकास कामे सुरू ठेवली होती. अनेक कामे पूर्ण झाली असून लोकार्पण केले आहे. जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा सक्षम करण्यास प्राधान्य दिले. खासदार श्रीरंग बारणे यांचा उद्घाटने, भूमिपूजन करण्याचा झंझावाती दौरा सुरू आहे. गावातील अंतर्गत रस्ते सुस्थितीत झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत खासदार बारणे यांचे आभार मानले.

खासदार बारणे म्हणाले की, मावळ तालुक्यातील विविध गावांमध्ये अंतर्गत रस्त्यांचा अभाव होता. डांबरीकरणाचे रस्ते नव्हते. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांचे हाल होत होते. रस्त्याने चालणे कठीण होत असे. त्यामुळे गावातील रस्ते विकास करण्यावर भर दिला. वाड्या, वस्त्यांपर्यंत रस्ते करण्यास प्राधान्य दिले आहे. अनेक गावांमधील रस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत. तर, काही गावातील कामे अंतिम टप्प्यात आहेत. विविध गावात सभामंडप उभारले आहेत. रस्त्यांसह सर्व कामे दर्जेदार, ठिकाऊ केली आहेत. भूमिपूजन केलेल्या कामाचा दर्जा राखण्याच्या सूचना कंत्राटदाराला दिल्या आहेत.

# पीसीसीओईआर मध्ये 'वाहतूक व्यवस्थापन' यावर परिसंवाद

## वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे




**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** विद्यार्थ्यांनी जीवनास आकार देत असताना जबाबदारीचे भान ठेवून वागले पाहिजे. त्याचप्रमाणे वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. वाहनांचा कमीत कमी आणि गरजेनुसार वापर करावा. प्रदूषणाबाबत जागरूक राहावे. वेगावर नियंत्रण ठेवून सुरक्षित वाहन चालवावे. आपले जीवन अत्यंत मौल्यवान असून राष्ट्र उभारणीत त्याचे योगदान द्यावे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे उपायुक्त विवेक पाटील यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग ॲण्ड रिसर्च, (पीसीसीओईआर) येथे 'वाहतूक व्यवस्थापन' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देऊन मार्गदर्शन केले. यावेळी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील टोणपे, प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, प्रबंधक प्रकाश येवले, प्रा. अनिल काटे, डॉ. राहुल मापारी, डॉ. सुदर्शन बोबडे आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड शहरात गेल्या पाच वर्षात झालेल्या अपघातांमध्ये मृत्यू पावलेल्या नागरिकांमध्ये ७० टक्के तरुण होते तर ७५ टक्के अपघात व्यसनाधीनतेमुळे झाले आहेत. हे पाहणीतून समोर आले आहे, असे सुनील टोणपे यांनी सांगितले. जबाबदारीने वाहन चालवून वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे. रस्त्याच्या बाजूला अथवा महामार्गावर वाहन चालकांसाठी सूचना दिलेल्या असतात त्याचे पालन करा. शहरात अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्यामुळे नियम भंग करणारा पोलिसांच्या नजरेतून सुटू शकत नाही. नियम भंग करू नका आपल्या घरी आपली कुणीतरी वाट पाहत आहे. आपण सुखरूप घरी पोहोचले पाहिजे याचे भान ठेवा.

# आम्हीही लढू, रोहित पवारांचं ओपन चॅलेंज

## लोक आपल्याला स्वीकारणार नाहीत ही अजित पवारांनी भीती

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बारामती लोकसभेच्या निवडणुकीतसुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार त्यांच्याच कुटुंबातील एका व्यक्तीला उभा करतील असा मोठा दावा राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजितदादांनी बारामतीमध्ये रविवारी जे भाषण केलं त्यामध्ये अहंकार दिसत होता असंही ते म्हणाले. रोहित पवारांच्या या दाव्यानंतर आता अजित पवारांसोबतचा त्यांच्या संघर्षाला अधिक धार येण्याची चिन्हं आहेत. बीडमध्ये एका कार्यक्रमानंतर रोहित पवारांनी माध्यमांशी संवाद साधताना हा दावा केला. रोहित पवारांनी अजित पवारांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, बारामती लोकसभेच्या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार त्यांच्या कुटुंबातीलच एका व्यक्तीला तिकीट देतील आणि सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणुकीत उभं करतील. अजित पवार यांनी काल जे भाषण केले त्या भाषणामध्ये त्यांच्यातला अहंकार दिसत होता. त्यामुळे सत्तेमध्ये राहून अजित पवार हे स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीला निवडून आणतील, मात्र आम्ही लोकांना विश्वासात घेऊन या बलाढ्य शक्तीसोबत लढत राहू. बीड येथील रयत शिक्षण संस्थेच्या कंकालेश्वर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी रोहित पवार बीडमध्ये आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी पहिल्यांदाच बारामती लोकसभा निवडणुकीवर भाष्य केलं. अजित पवार यांच्या कुटुंबातील एक व्यक्ती सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उभा राहील, भाजपला पवार कुटुंबात फुट पडावी अशी भाजपची इच्छा असल्याचा दावा रोहित पवारांनी केला. आमदार रोहित पवार यांच्या हस्ते आज बीडमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कंकालेश्वर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच उद्घाटन करण्यात आलं.. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना रोहित पवार यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली तर ईडीच्या कारवाईला देखील घाबरत नसल्याचं रोहित पवार यांनी स्पष्ट केलं. बारामती लोकसभा निवडणूक लढवणार आणि जिंकणार असा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. तसेच बारामतीच्या लोकांनी आतापर्यंत वरिष्ठांचं ऐकलं, आता माझं ऐकावं असं आवाहनही अजित पवारांनी केलं होतं. बारामतीच्या लोकांनी विधानसभेला एक आणि लोकसभेला एक असं मतदान करू नये, दोन्हीवेळाही आपल्याला मतदान करावं असं आवाहन अजित पवारांनी केलं. भाषणामध्ये अजित पवार यांनी शरद पवार यांच्याबद्दल जे वक्तव्य केले आहे त्याची मला अपेक्षा नव्हती असं रोहित पवार म्हणाले. आम्ही ज्या दादांना ओळखतो ते दादा आता राहिलेले नाहीत, भाजपमध्ये जाऊन ते भाजपच्या विचारावर चालत आहेत. दिल्लीतले लोक खूश व्हावेत यासाठी ते शरद पवार यांच्यावर नेहमी टीका करतात, त्यांच्या वयाचा उल्लेख करतात. सत्तेमध्ये असलेल्या अजितदादा यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोललं पाहिजे, युवकांच्या प्रश्नावर बोललं पाहिजे, बेरोजगारी कशी संपवता येईल यासाठी त्यांनी लोकांना विश्वास दिला पाहिजे.





### मी मैदान सोडणार नाही

» मात्र लोक आपल्याला स्वीकारणार नाहीत या भीतीने ते सातत्याने शरद पवार यांच्यावर टीका करत आहेत. भाजपमध्ये गेल्यामुळे त्यांना देखील भाजपच्या व्हायरसची लागण झाल्याचे रोहित पवार म्हणाले. ईडीच्या कारवाईवर बोलताना रोहित पवार यांनी भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले की, गरज नसतानाही सध्या ईडीच्या चौकशीला मला सामोरे जावे लागत आहे. निवडणुका जवळ आल्याने राजकीय द्वेषापोटी माझ्यावर ईडीची कारवाई केली जात आहे. माझ्यावर कारवाई करतील, मला अटक करतील. तरी देखील मी मैदान सोडणार नाही.

# स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या

## गणेश मारणे याच्यापासून जीवाला धोका, स्वाती मोहोळ यांचा दावा

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शरद मोहोळहत्या प्रकरणातील आरोपी मुन्ना पोळेकर याच्या नावाने स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. सोशल मीडियाप्लॅटफॉर्मवर मुन्ना पोळेकरच्या नावाने अकाऊंट बनवत स्वाती मोहोळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. स्वाती मोहोळ यांना मेसेज करुन आणि आक्षेपार्ह पोस्ट करत हा प्रकार केलाय.

मुन्ना पोळेकर हा शरद मोहोळहत्या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. काही दिवसापूर्वीच पुण्यात कुख्यात गुंड शरद मोहोळची गोळ्या झाडत करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणात पोलिसांचा तपास सुरुच आहेत. शरद मोहोळची पत्नी काही दिवसपूर्वी माध्यमांसमोर आली होती. माझ्या पतीच्या जाण्याने मी खचणार नाही, असेही तिने स्पष्ट केले होते. शरद मोहोळची पत्नी स्वाती मोहोळ आणि फिर्यादी अरुण धृपद धुमाळ यांनी गणेश मारणे आणि विठ्ठल शेलार यांच्यापासून जीवाला धोका असल्याची माहिती पोलिसांना दिली होती. तपास अधिकारी सहायक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी गुरुवारी न्यायालयात याबाबतची माहिती दिली होती. दरम्यान आता अजून एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा दावा स्वाती मोहोळने केलाय. शरद मोहोळच्या लग्नाचा वाढदिवशी त्याच्या आयुष्याची दोरी कापली गेली होती.तिघांनी त्यांच्याजवळील पिस्तुलातून झाडलेल्या गोळ्यांपैकी दोन गोळ्या शरद मोहोळच्या मानेत लागल्या, एक छातीत तर एक गोळी शरद मोहोळच्या डोक्यात लागली. काही कळायच्या आत पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात गेली दीड दशके दहशत असलेला शरद मोहोळ रक्ताच्या थारोळ्यात पडला. शरद मोहोळहत्या प्रकरणातील आरोपी मुन्ना पोळेकर याच्या नावाने स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. सोशल मीडियाप्लॅटफॉर्मवर मुन्ना पोळेकरच्या नावाने अकाऊंट बनवत स्वाती मोहोळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. स्वाती मोहोळ यांना मेसेज करुन आणि आक्षेपार्ह पोस्ट करत हा प्रकार केलाय.





# आव्हाडांनी मुंब्रा भागापुरतेच मर्यादित राहावे

## राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांचे विधान



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मी लवकरच लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर करणार आहे. काही लोक येतील भावनिक साद घालतील, ही शेवटची निवडणूक असल्याचे सांगतील, पण तुम्ही मात्र अजित पवार उभा आहे हे समजून मतदान करा. कधी शेवटची निवडणूक असेल काय माहीत, अशा शब्दात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथील एका कार्यक्रमात भाषण करतेवेळी नाव न घेता शरद पवार यांच्यावर निशाणा साधला होता. त्यानंतर आता या वक्तव्याचे पडसाद उमटू लागले आहेत.अजित पवार यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मला अजित पवारांबरोबर काम केल्याची लाज वाटते. एखाद्या माणसाच्या मृत्यूची प्रार्थना करणं, याचना करणं हे माणूसकीला शोभणारं आहे का ? शरद पवार हे देशाचे नेते तुम्हाला महाराष्ट्रात कोण ओळखत नाही. ज्या कुटुंबाने, ज्या माऊलीने तुम्हाला सर्व दिले तीचे कुंकू कधी पुसलं जाईल,याची आज तुम्ही वाट बघता आहात का? अशा शब्दात जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली होती.आता या सर्व घडामोडीदरम्यान अजित पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे शहराध्यक्ष दिपक मानकर म्हणाले की, आम्ही सर्वच शरद पवार यांचा आदरच करतो. पण अजित पवार हे काही चुकीचे बोलले नसून भावनिक आवाहनावर कोणतीही निवडणूक होत नाही. भावनेचा आदर करावा, पण त्याच्या आहारी कोणीही जाऊ नये, असे आवाहन केले. तसेच ते पुढे म्हणाले की, राज्याच्या अनेक भागांत शरद पवार यांनी काम केले आहे. त्यांच्या प्रमाणेच अजित पवारदेखील काम करीत आहेत. त्यामुळे आता शरद पवार यांची अजित पवार यांना आशीर्वाद देण्याची वेळ असून त्यांनी तो आशीर्वाद द्यावा, तसे झाल्यास सध्या जो काही वाद सुरू आहे तो निश्चितपणे थांबले, अशी भूमिकादेखील त्यांनी मांडली.मी पवार साहेबांच्या किती जवळचा आहे हे दाखवण्याचा प्रयत्न नेहमीच जितेंद्र आव्हाड करित आले आहेत. माझे शरद पवार साहेबांवर किती प्रेम आहे. आमचेदेखील प्रेम आहे. पण गरजेपुरत प्रेम नसावे, तसेच राजकीय जीवनात जितेंद्र आव्हाड यांच्या करीता अजितदादांनी खूप काही केले आहे. त्यामुळे तुम्ही (जितेंद्र आव्हाड) काय आहात, हे आम्हाला माहिती आहे. तुम्ही काय काय भानगडी केल्या आहेत त्याचा सातबारा देऊ का ? त्यामुळे आपल्या (जितेंद्र आव्हाड) मुंब्रा भागापुरतेच मर्यादित राहावे. बारामती किंवा पुणे जिल्ह्यात लक्ष घालण्याची आवश्यकता नाही.

### तुम्हाला कोण ओळखत नाही

» काही लोक येतील भावनिक साद घालतील, ही शेवटची निवडणूक असल्याचे सांगतील, पण तुम्ही मात्र अजित पवार उभा आहे हे समजून मतदान करा. कधी शेवटची निवडणूक असेल काय माहीत, अशा शब्दात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथील एका कार्यक्रमात भाषण करतेवेळी नाव न घेता शरद पवार यांच्यावर निशाणा साधला होता. अजित पवार यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मला अजित पवारांबरोबर काम केल्याची लाज वाटते. एखाद्या माणसाच्या मृत्यूची प्रार्थना करणं, याचना करणं हे माणूसकीला शोभणारं आहे का ? शरद पवार हे देशाचे नेते तुम्हाला महाराष्ट्रात कोण ओळखत नाही.

# दाभेकर हेमंत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट

## श्रीकांत शिंदे यांची 'वर्षा'वर भेट घेणारा हेमंत दाभेकर कोण?



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ यांनी गुंड गजानन मारणे याची घेतलेली भेट, तसेच कल्याणमधील भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेनेचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर पोलीस ठाण्यात केलेल्या गोळीबारानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राजकीय पक्षाचे नेते आणि गुंडांच्या संबंधावरून टीका होत असताना गुंड शरद मोहोळ याचा जवळचा साथीदार हेमंत दाभेकरने वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे सुपुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दाभेकर याने शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पुण्यातील निलायम चित्रपटागृहाजवळ असलेल्या उपहारागृहात टोळीयुद्धातून शरद मोहोळ, हेमंत दाभेकर आणि साथीदारांनी गणेश मारणे टोळीतील किशोर मारणेचा खून केला होता. याप्रकरणात मोहोळ, दाभेकरसह जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यानंतर खून प्रकरणात त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. गेल्या महिन्यात ५ जानेवारी रोजी मोहोळचा कोथरुडमधील सुतारदरा परिसरात वर्चस्वाच्या वादातून गणेश मारणेच्या साथीदारांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून खून केला होता. मोहोळची पत्नी स्वाती हिने काही महिन्यांपूर्वी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. मोहोळच्या खुनानंतर शहरात खळबळ उडाली होती. दाभेकर मोहोळचा जवळचा साथीदार आहे.खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा वाढदिवस नुकताच साजरा करण्यात आला. दाभेकर याने मुख्यमंत्र्यांच्या मुंबई निवासस्थानी वर्षा बंगल्यावर डॉ. शिंदे यांची भेट घेतली. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. समाजमाध्यमात दाभेकर अणि डॉ. शिंदे भेटीचे छायाचित्र प्रसारित झाले.गुंड गजानन मारणेची पत्नी जयश्री यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मोहोळच्या पत्नीने भारतीय जनता पक्षाचे काम कोथरुड भागात सुरू केले होते. पार्थ पवार यांनी मारणेची भेट घेतली. या भेटीवरुन अजित पवार यांनी जाहीरपणे पार्थ यांना खडे बोल सुनावले होते. त्यापाठोपाठ मोहोळचा जवळचा साथीदार दाभेकर याने वर्षा निवासस्थानी जाऊन खासदार शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यानंतर समाजमाध्यमात अनेकांनी नाराजी व्यक्त केली. दाभेकरविरुद्ध खून, खंडणी, अपहरण असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.